# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११
# नियामक मंडळाची ८८ वी बैठक दिनांक १९ ऑगस्ट २०१४

## ठराव

मा. ना. शशिकांत शिंदे, मंत्री, जलसंपदा (कृखोपामं) व अध्यक्ष, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ यांच्या अध्यक्षतेखाली नियामक मंडळाची ८८ वी बैठक मंगळवार दि. १९ ऑगस्ट २०१४ रोजी मा. उपमुख्यमंत्री महोदय यांचे समिती कक्ष क्र. ०३४, तळ मजला, विधानभवन, मुंबई-३२ येथे संपन्न झाली.

सदर बैठकीस खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य व निमंत्रित अधिकारी उपस्थित होते.

**सन्माननीय सदस्य**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मा. ना. शशिकांत शिंदे | ... | मंत्री, जलसंपदा (कृखोपाम) व अध्यक्ष |
| २. | श्रीमती मालिनी शंकर | ... | प्रधान सचिव (जव्य व लावि) व सदस्य |
| ३. | इंजि. शि.मा. उपासे | ... | कार्यकारी संचालक व सदस्य सचिव |

**निमंत्रित अधिकारी**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | इं. अविनाश सुर्वे | ... | मुख्य अभियंता (जसं), पुणे |
| २. | इं. पं. छ. घोलप | ... | मुख्य अभियंता (विप्र), पुणे (अ.का.) |
| ३. | श्री. अजित मोरे | ... | मुख्य लेखा व वित्त अधिकारी |

बैठकीच्या सुरुवातीस कार्यकारी संचालक व सदस्य सचिव यांनी मा. अध्यक्ष, सन्माननीय सदस्य व उपस्थितांचे स्वागत केले. तद्नंतर बैठकीत विषयवार चर्चा होऊन खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यांत आले.

"मान्य"

कार्यकारी संचालक
म.कृ.खो.वि.म, पुणे

मा.मंत्री, जलसंपदा (कृ.खो.पा.म.)
व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म. पुणे

## महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११
## नियामक मंडळाची ८८ वी बैठक दिनांक १९ ऑगस्ट २०१४

## ठराव

**ठराव क्र. ८८/१**

**"ठराव करण्यात येतो की, दिनांक ०१/०७/२०१४ रोजी संपन्न झालेल्या नियामक मंडळाच्या ८५ व्या बैठकीत पारीत केलेल्या ठरावांवर करण्यात आलेल्या कार्यवाहीचे नियामक मंडळाने अवलोकन केले आहे."**

**ठराव क्रमांक ८८/२**

**"ठराव करण्यात येतो की, दि. १३/०८/२०१४ रोजी संपन्न झालेल्या नियामक मंडळाच्या ८७व्या बैठकीत पारित करण्यात आलेले ठराव खालील प्रमाणे कायम करण्यात येत आहेत."**

ठराव क्रमांक ८७/३

"ठराव करण्यात येतो की, कण्हेर प्रकल्पांतर्गत मौजे वेळे (वेणेगाव) ता. जि. सातारा येथील पुनर्वसित गावठाणात वाटप केलेल्या भूखंडावर, श्री. पांडुरंग श्रीरंग शिंदे व श्री. शिवाजी श्रीपती जाधव यांनी घरे बांधल्यानंतर ही जमिन संपादनातून वगळल्याने त्या घरांची नुकसान भरपाई देण्याबाबतचा प्रश्न उपस्थित झाला आहे. या अनुषंगाने या विषया बाबतची सखोल चौकशी करुन संबंधितांना नुकसान भरपाई देण्याबाबतचा निर्णय महसूल खात्याने त्यांच्या स्तरावर घ्यावा."

ठराव क्रमांक ८७/४

"ठराव करण्यात येतो की, महामंडळाच्या ताब्यातील मौजे तरंगफळ ता. माळशिरस जि. सोलापूर येथील स.नं. १५ लगत नीरा उजवा कालव्याच्या कि.मी. १२६ साठी संपादित केलेल्या जागेपैकी, २ आर विनावापर जागा खालील अटींच्या अधिन राहून जिल्हाधिकारी, सोलापूर यांचेकडे वर्ग करुन त्यांचेमार्फत ग्रामपंचायत तरंगफळ ता.माळशिरस यांना कायमस्वरुपी देण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

अटी :
1. ग्रामपंचायत तरंगफळ यांनी सदर जागा जिल्हाधिकारी, सोलापूर यांचेकडून प्राप्त करुन घेण्यापूर्वी त्या जागेचे विहित नियमानुसार येणारे मूल्य महामंडळास आगाऊ अदा करावे.
2. कालव्यावरुन पिण्याच्या पाण्यासाठी आवश्यक असणारा पाणी परवाना अर्जदार संस्थेने जलसंपदा विभागाकडून (महामंडळाकडून) घ्यावा.
3. सदर जागा ज्या उद्देशासाठी देण्यात आली आहे त्या व्यतिरिक्त अन्य कोणत्याही कारणासाठी वापरण्यात येऊ नये.

**"मान्य"**

**कार्यकारी संचालक**
**म.कृ.खो.वि.म, पुणे**

**मा.मंत्री, जलसंपदा (कृ.खो.पा.म.)**
**व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म. पुणे**

# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११
# नियामक मंडळाची ८८ वी बैठक दिनांक १९ ऑगस्ट २०१४

ठराव क्रमांक ८७/५

“ठराव करण्यात येतो की, महामंडळांतर्गत धरणे / पंपगृहे / स्विचयार्डस / महत्वाची कार्यालये / वसाहती यांच्या सुरक्षिततेसाठी शासनाच्या आस्थापनेवरील चौकीदार उपलब्ध नसल्यास खाजगी सुरक्षा यंत्रणा वापरण्यास तत्वत: मान्यता देण्यात येत आहे. तथापि याबाबत धोरणात्मक बाब म्हणून प्रस्ताव शासनास मान्यतेसाठी सादर करावो. तसेच महत्वाची धरणे, महत्वाची बांधकामे यांच्यासाठी कायमस्वरुपी सुरक्षा आस्थापना निर्मितीसाठीचा प्रस्ताव शासनास सादर करावा.

तसेच नव्याने बांधण्यात आलेल्या प्रकल्पांच्या देखभालीसाठी / सुरक्षिततेसाठी योजना बाह्य निधी मिळण्यासाठी नवीन लेखाशोर्ष (CERC Code) निर्माण होण्याचा प्रस्ताव शासनास सादर करावा.

दरम्यानच्या काळात अति महत्वाची धरणे व बांधकामे यांची यादी मुख्य अभियंता स्तरावर निश्चित करुन त्यासाठी शासनाच्या आस्थापनेवरील चौकीदार उपलब्ध नसल्यास, शासनाने स्थापन केलेल्या सुरक्षा रक्षक मंडळाकडून व ज्या ठिकाणी अशी मंडळे स्थापन झालेली नाहीत, त्या ठिकाणी माजी सैनिकांच्या नोंदणीकृत संघटनेमधून खाजगी सुरक्षा यंत्रणे मार्फत सुरक्षा रक्षक घेण्यात यावेत व त्यासाठीचा खर्च आस्थापनेमधून उपलब्ध होणाऱ्या निधीतून करावा”

ठराव क्रमांक ८७/६

भूसंपादन अधिनियम १८९४ अनुसार खाजगी व्यवहाराने को.प.बंधारा मिरे तालुका माळशिरस, बुडीत क्षेत्राकरीता मौजे म्हाळुंग ता.माळशिरस येथील खरेदी केलेल्या जमिनीसाठी वाढीव मोबदला देण्याबाबत मा. मंत्री (कृखोपाम) यांचे स्तरावर तत्कालीन सर्व संबंधित क्षेत्रिय अधिकारी (शा.अ./उ.अ./का.अ./अ.अ.) यांचे समवेत बैठक आयोजित करावी असे ठरले असल्याने या विषयी कोणताही ठराव पारित करण्यात आला नाही.

ठराव क्रमांक ८७/७

“ठराव करण्यात येतो की, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळांतर्गत विविध परवानग्यांसाठी महामंडळाने निर्गमित केलेल्या दिनांक १२/०५/२००५ रोजीच्या परिपत्रकातील मंजूर दरांऐवजी, अशा विविध बाबींसाठी शासनाचे प्रचलित दर वापरण्याचा सविस्तर प्रस्ताव पुढील निर्णयार्थ शासनास सादर करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे.”

ठराव क्रमांक ८७/८

“ठराव करण्यांत येतो की, आंबेओहोळ मध्यम पाटबंधारे प्रकल्पाच्या (ता.आजरा, जि.कोल्हापूर) बुडित क्षेत्रातील मौजे उत्तूर, आर्दाळ, करपेवाडी, होन्याळी, हालेवाडी व वडकशिवाले या गावांच्या मंजूर निवाडयांमधून राहून गेलेल्या झाप/ खोप/ शेड/ विहीर / विंधनविहीर / पाईपलाइन / फळझाडे /वनझाडे/ मेसकाठी व बांबू इत्यादी बाबींची जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांनी प्रमाणित केलेली एकूण मोबदला रक्कम

**“मान्य”**

| | |
|---|---|
| **कार्यकारी संचालक** | **मा.मंत्री, जलसंपदा (कृ.खो.पा.म.)** |
| **म.कृ.खो.वि.म, पुणे** | **व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म. पुणे** |

# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११
# नियामक मंडळाची ८८ वी बैठक दिनांक १९ ऑगस्ट २०१४

रू. २.१३ कोटी सानुग्रह अनुदान म्हणून जलसंपदा विभागामार्फत प्रकल्पग्रस्तांना अदा करणेस नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे.”

**ठराव क्रमांक ८७/९**

**“ठराव करण्यात येतो की, सातारा नगरपालिकेकडून महामंडळाकडे ठेव अनुदान तत्वावर देण्यात आलेले “कास धरण, सातारा याची उंची वाढविणेचे काम” मूळ ठेकेदाराची विनंती विचारात घेऊन निविदा शर्तीनुसार सबलेट करण्यास नियामक मंडळाची ‘विशेष बाब म्हणून’ मान्यता देण्यात येत आहे.”**

ठराव क्रमांक ८७/१०

“ठराव करण्यात येतो की, कृष्णानगर वसाहत ,सातारा येथील वनवासवाडी हद्दीतील गट क्र.१४ मधील २० आर विनावापर क्षेत्र मौजे खेड ग्रामपंचायतीस ग्रामपंचायत कार्यालय इमारत बांधण्यासाठी खालील अटींच्या अधीन राहून जिल्हाधिकारी, सातारा यांचेकडे वर्ग करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे.

अट : १) सदर जमिनीची शीघ्र सिद्ध गणकानुसार येणारी किंमत महामंडळास प्रथम जमा करावी.
२) जमिन ज्या उद्देशासाठी हस्तांतरीत केलेली आहे. त्या व्यतिरिक्त वेगळ्या कारणासाठी वापर करु नये. ”

ठराव क्रमांक ८७/११

“ठराव करण्यांत येतो की, कालव्यासाठी / धरणासाठी संपादित असलेल्या परंतू सध्या अतिरिक्त / विनावापर असलेल्या जागा खालील प्रमाणे विविध ग्रामीण पाणी पुरवठा योजनांसाठी पुढील अटींच्या अधिन राहून जिल्हाधिकारी यांचेकडे वर्ग करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यांत येत आहे.

अटी: (१) जलसंपदा विभागाकडून पाणीवापराची रितसर परवानगी घेण्यात यावी,
(२) जिल्हाधिकारी यांचेकडून मालकी हक्काची निश्चिती करण्यात यावी,
(३) सदर जागेचे शासकीय मूल्य महामंडळास देण्यात यावे.”

| अ. क्र. | ग्रामपंचायत नळपाणी पुरवठा योजनेचे नांव | हस्तांतरीत करावयाचे अभिकरणाचे नांव | कायम स्वरूपी हस्तांतरण करावयाचे क्षेत्र (हेक्टर) | क्षेत्र हस्तांतरीत करावयाचे जिल्हाधिकारी कार्यालय |
|---|---|---|---|---|
| १ | लोणी भापकर होळ प्रादेशिक नळपाणी पुरवठा योजना ता.बारामती जि. पुणे - साठवण तलावासाठी. | महाराष्ट्र जीवन प्राधिकरण | २.८५ हेक्टर | जिल्हाधिकारी, पुणे |

**“मान्य”**

**कार्यकारी संचालक**
**म.कृ.खो.वि.म, पुणे**

**मा.मंत्री, जलसंपदा (कृ.खो.पा.म.)**
**व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म. पुणे**

# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११

## नियामक मंडळाची ८८ वी बैठक दिनांक १९ ऑगस्ट २०१४

| अ. क्र. | ग्रामपंचायत नळपाणी पुरवठा योजनेचे नांव | हस्तांतरीत करावयाचे अभिकरणाचे नांव | कायम स्वरूपी हस्तांतरण करावयाचे क्षेत्र (हेक्टर) | क्षेत्र हस्तांतरीत करावयाचे जिल्हाधिकारी कार्यालय |
|---|---|---|---|---|
| २ | ग्रामपंचायत वाणेवाडी, ता.बारामती, जि.पुणे -साठवण तलावासाठी | ग्रामपंचायत वाणेवाडी ता.बारामती, जि.पुणे | ०.४० हेक्टर | जिल्हाधिकारी, पुणे |
| ३ | तांदुळवाडी नळपाणी पुरवठा योजना ता.बारामती, जि.पुणे. -साठवण तलावासाठी | महाराष्ट्र जीवन प्राधिकरण | २ हेक्टर | जिल्हाधिकारी, पुणे |
| ४ | मुर्टी मोढवे प्रादेशिक नळपाणी पुरवठा योजना ता.बारामती, जि.पुणे. मौ.शेंडकरवाडी (करंजे पूल) -साठवण तलावासाठी. | महाराष्ट्र जीवन प्राधिकरण | १.६१ हेक्टर | जिल्हाधिकारी, पुणे |
| ५ | ग्रामपंचायत चोपडज् अंतर्गत कानजवाडी व इतर वाड्याकरिता नळपाणी पुरवठा योजना ता.बारामती जि.पुणे -विहिरीसाठी. | ग्रामपंचायत चोपडज् अंतर्गत कानजवाडी व इतर वाड्यांकरिता, ता.बारामती, जि.पुणे. | ०.०२ हेक्टर | जिल्हाधिकारी, पुणे |
| ६ | मौ.कर्नलवाडी (गुळूंचे) ता.पुरंदर जि.पुणे पाणी पुरवठा योजना --विहिरीसाठी | मौ.कर्नलवाडी (गुळूंचे) ता.पुरंदर जि.पुणे | ०.०४ हेक्टर | जिल्हाधिकारी, पुणे |
| ७ | थोपटेवाडी-लाटे ता.बारामती, जि.पुणे प्रादेशिक नळपाणी पुरवठा योजना -साठवण तलावासाठी | महाराष्ट्र जीवन प्राधिकरण | ३.१९ हेक्टर | जिल्हाधिकारी, पुणे |
| ८ | ग्रामपंचायत नांदवळ ता.कोरेगांव, जि.सातारा -विहिरीसाठी | ग्रामपंचायत नांदवळ ता.कोरेगांव, जि.सातारा | ०.०२ हेक्टर | जिल्हाधिकारी, सातारा. |
| ९ | ग्रामपंचायत जांभुळवाडी-कोळेवाडी, ता.हवेली, जि.पुणे. - विहिरीसाठी. | ग्रामपंचायत जांभुळवाडी-कोळेवाडी, ता.हवेली, जि.पुणे. | ०.०२ हेक्टर | जिल्हाधिकारी, पुणे. |
| १० | ग्रामपंचायत,शिर्सुफळ,ता.बारामती, जि.पुणे. - विहिरीसाठी. | ग्रामपंचायत, शिर्सुफळ, ता.बारामती, जि.पुणे. | ०.०२ हेक्टर | जिल्हाधिकारी, पुणे. |
| ११ | ग्रामपंचायत कचरवाडी (निमगांव केतकी)ता.इंदापूर,जि.पुणे.-पाणी पुरवठा योजना करण्याकामी. | ग्रामपंचायत कचरवाडी (निमगांव केतकी) ता.इंदापूर, जि.पुणे. | ०.०१ हेक्टर | जिल्हाधिकारी, पुणे. |

"मान्य"

कार्यकारी संचालक
म.कृ.खो.वि.म, पुणे

मा.मंत्री, जलसंपदा (कृ.खो.वि.म.)
व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म. पुणे

# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११
# नियामक मंडळाची ८८ वी बैठक दिनांक १९ ऑगस्ट २०१४

विश्वनात राष्ट्रोद्धारः

**ठराव क्रमांक ८७/१२**

"ठराव करण्यात येतो की, जंगमहट्टी मध्यम प्रकल्प, ता.चंदगड, जि.कोल्हापूर या प्रकल्पांतर्गत बुडित क्षेत्रातील संपादित जमिनीतील मिळकत क्र. १२८ ते १३५ मधील घरांची जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांनी प्रमाणित केलेली मोबदला रक्कम रु.६,८०,२८५/- संबंधित शेतकऱ्यांना जिल्हाधिकाऱ्यांमार्फत अदा करण्यास नियामक मंडळाची मंजूरी देण्यांत येत आहे."

**ठराव क्रमांक ८७/१३**

"ठराव करण्यात येतो की, शासनाचे वित्त विभागाच्या "राज्य सार्वजनिक उपक्रमांनी त्यांचेकडील अतिरिक्त निधी बँकेत गुंतवताना घ्यावयाची दक्षता' याबाबतच्या दि.२४.०७.२०१४ रोजीच्या परिपत्रकाचे नियामक मंडळाने अवलोकन केले आहे. त्यातील सूचनेनुसार महामंडळातील निधी बँकेत गुंतविण्याबाबत कार्यवाही करावी."

**ठराव क्रमांक ८७/१४**

"ठराव करण्यांत येतो की, केंद्र/राज्य शासनाच्या विविध स्त्रोतातून/ कार्यक्रमाद्वारे मंजूरी मिळालेल्या सार्वजनिक पाणीपुरवठा योजनेअंतर्गत महानगरपालिका/नगरपालिका/नगरपरिषद/ ग्रामपंचायत यांचेकडून विहीर/पाण्याची टाकी / साठवण तलाव इत्यादी साठी मागणी केलेल्या महामंडळाकडील अतिरिक्त / विनावापर जमीनी (जमीनीची शासकीय किंमत महामंडळास मिळण्याच्या अटीवर) संबंधित नगरपालिका/ ग्रामपंचायत यांना देण्यासाठी संबंधीत जिल्हाधिकारी यांचेकडे वर्ग करण्याचे अधिकार कार्यकारी संचालक यांना मा. मंत्री जलसंपदा (कृखोपाम) तथा अध्यक्ष महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ यांचे मान्यतेने प्रदान करण्यांस नियामक मंडळाची मान्यता देण्यांत येत आहे. याबाबत महामंडळाच्या अधिनियमातील कलम ६३ मधील तरतूदीनुसार शासनाची पूर्व मान्यता घेण्यात यावी."

**ठराव क्रमांक ८७/१५**

"दूधगंगा एज्युकेशन ॲकॅडेमी इस्पुर्ली ता.करवीर जि.कोल्हापूर या संस्थेस दूधगंगा प्रकल्पांतर्गत इस्पुर्ली वसाहतीमधील वाढीव ९ विनावापर इमारती व १ गोडाऊन भाडेपट्टयाने देणेबाबत कोणताही ठराव पारीत करण्यात आला नाही."

**ठराव क्रमांक ८७/१६**

"शिवप्रेरणा शिक्षक संस्था, उंब्रज यांना यांत्रिकी वसाहत, कोळवाडी, ता. जुन्नर येथील विनावापर असलेल्या २४ खोल्या ५ वर्षाकरिता ११ महिन्यांचे कराराने भाडेपट्टयाने देणेबाबत कोणताही ठराव पारीत करण्यात आला नाही."

**ठराव क्रमाक ८७/१७**

"मौजे बेल्हे, ता. जुन्नर येथील पाटबंधारे वसाहतीमधील दोन खोल्या जिल्हा परिषद प्राथमिक शाळा इंदिरा नगर, बेल्हे, ता. जुन्नर या शाळेसाठी ५ वर्षाकरिता ११ महिन्याचे कराराने भाडेपट्टयाने देणे बाबत कोणताही ठराव पारीत करण्यात आला नाही."

"मान्य"

कार्यकारी संचालक
म.कृ.खो.वि.म, पुणे

मा.मंत्री, जलसंपदा (कृ.खो.पा.म.)
व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म. पुणे

# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११
# नियामक मंडळाची ८८ वी बैठक दिनांक १९ ऑगस्ट २०१४

ठराव क्रमांक ८७/१८

"ठराव करण्यांत येतो की, वडगांव बु।। ता.हवेली, जि. पुणे येथील पोलीस चौकी बांधणेसाठी स.नं.६१ मधील १०,००० चौ.फूट विनावापर / अतिरिक्त जागा चालू मूल्यांकनानुसारची किंमत महामंडळास अदा करणेच्या अटीच्या अधिन राहून जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडे वर्ग करण्यांस नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

ठराव क्रमांक ८७/१९

"ठराव करण्यात येतो की, दूधगंगा धरणाच्या बुडीत क्षेत्राबाहेरील गट क्र.५१ मधील १.३५ हे. व दूधगंगानगर वसाहतीमधील गट क्र. १५४, १५५, १६८ मधील ०.३७५ हे. अशी एकूण १.७२५ हे. अतिरिक्त / विनावापर जमीन कोल्हापूर महानगरपालिका,कोल्हापूर यांना पाणी पुरवठा योजनेसाठी प्रचलित दरानुसार भाडेतत्वावर देण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

ठराव क्रमांक ८७/२०

"सन २०१२-१३ या वर्षाच्या महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाच्या लेखा परीक्षणानंतर महालेखापाल, मुंबई यांनी दिनांक ३०/०५/२०१४ नुसार निर्गमित केलेला अलग लेखा परीक्षण अहवाल नियामक मंडळाच्या पुढील बैठकीत ठेवण्याचे ठरल्यामुळे या विषयाबाबत कोणताही ठराव पारित करण्यात आला नाही."

**ठराव क्रमांक ८८/३**

**"ठराव करण्यात येतो की, सन २०१२-१३ या वर्षाच्या महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाच्या लेखा परीक्षणानंतर महालेखापाल, मुंबई यांनी दिनांक ३०/०५/२०१४ नुसार निर्गमित केलेला अलग लेखा परीक्षण अहवाल अनुपालनासह राज्य शासनामार्फत विधी मंडळासमोर सादर करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."**

तद्‌नतर मा. अध्यक्ष यांचे परवानगीने कार्यकारी संचालक व सदस्य सचिव यांनी मा. अध्यक्ष, मा. उपाध्यक्ष, सन्माननीय सदस्य व उपस्थितांचे आभार मानून बैठक संपन्न झाल्याचे जाहीर केले.

"मान्य"

**(इंजि. शि. मा. उपासे)**
कार्यकारी संचालक
म.कृ.खो.वि.म, पुणे

**(मा. ना. श्री. शशिकांत शिंदे)**
**मा.मंत्री, जलसंपदा (कृ.खो.पा.म.)**
**व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म. पुणे**